# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६
☎ २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश २०१७/२०१७/ ३५९१ दिनांक : १९/०८/२०१७

21 AUG 2017

प्रति,
प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व पदविका विनाअनुदानीत
अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय – शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एस एस सी प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील प्रथम फेरीतील सुधारित अलॉटमेंटमधील प्रवशेबाबत.....

संदर्भ – दिनांक १८/०८/२०१७ रोजीचा संचालनालयाकडून प्राप्त झालेला ई मेल.

उपरोक्त विषयास व संदर्भिय ई मेल व्दारे प्राप्त सुचनांनुसार आपणास कळविण्यात येते की, संचालनालयाचे परिपत्रक्र क्रमांक १०/एडीएम/पदविका/२०१७/३८३० दिनांक १०/०८/२०१७ मधील मुद्या क्रमांक ३ मध्ये नमुद ज्या उमेदवारांना प्रथम फेरीमध्ये विना अनुदानित तंत्रनिकेतनामध्ये अलॉटमेंट झाले होते. त्यामुळे त्यांनी विना अनुदानीत तंत्रनिकेतनामधील प्रवेश फ्रिज करुन कन्फर्म केला आहे परंतू प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे (**As per Revosed Allotment**) उमेदवारांनी भरण्यात आलेला ऑपशन व गुणवत्तेनुसार दुस-या विना अनुदानीत तंत्रनिकेतनामध्ये अलॉट झाला अशा विद्यार्थ्यांना इच्छा असल्यास पहिल्या विनाअनुदानित संस्थेत जाऊन जर जागा रिक्त असतील आणि उमेदवारस अलॉट झालेला सिट टाईप उपलब्ध असले व संसथेने उमदवारास त्या रिक्त जागेवर प्रवेश देण्याचे निश्चित केले आहे अशा प्रकरणी उमेदवारांची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात **Excel** मध्ये (**Soft and Hard Copu**) **desk10@dtemaharashtra.gov.in** या ईमेलवर दि. २२/०८/२०१७ पर्यत सायकाही ५ वाजेपर्यत पाठविण्यात यावी.

सोबत - संदर्भिय पत्राची छायाप्रत

(signature) २१.८.१७
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ 3830

दिनांक: 10 AUG 2017

**विषय : शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील प्रथम फेरीतील सुधारित अलॉटमेंटमधील प्रवेशाबाबत...**

उपरोक्त विषयाचा अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रथम फेरीची अलॉटमेंट केली होती. परंतु, प्रथम फेरीचे अलॉटमेंट तांत्रिकी कारणास्तव चुकीची असल्याने प्रथम फेरीची सुधारित अलॉटमेंट करण्यात आली. त्याप्रमाणे या संचालनालयाने सुधारित अलॉटमेंट करण्यात आल्याचे SMS व्दारे सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात आले होते. तसेच याबाबत विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी या संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीही करण्यात आली होती. प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे उमेदवारांनी भरलेल्या ऑप्शन व गुणवत्तेनुसार बऱ्याच उमेदवारांचे प्रथम फेरीमध्ये झालेले अलॉटमेंट बदलल्याने त्यांना betterment नुसार ऑप्शन अलॉट झाले. परंतु, काही उमेदवारांनी प्रथम फेरीतील अलॉटमेंट फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केले होते व त्यांनी त्याच संस्थेत प्रवेश कर्न्फम करुन प्रवेश देण्यासंदर्भात विनंती अर्ज या संचालनालयास प्राप्त झाले आहेत. तरी, खालील नमुद अशा उमेदवाराबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यास या संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे.

1. ज्या उमेदवारांना प्रथम फेरीमध्ये शासकीय तंत्रकिनेतनामध्ये अलॉटमेंट झाले होते. त्यामुळे त्यांनी शासकीय तंत्रनिकेतनामधील प्रवेश फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केला आहे. परंतु, प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे (As per Revised Allotment) उमेदवारांनी भरण्यात आलेला ऑप्शन व गुणवत्तेनुसार तिसऱ्या फेरीपर्यंत betterment मिळालेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेत रिक्त होणाऱ्या अभ्यासक्रमांच्या चौथ्या फेरीमध्ये सहभाग घेऊन जास्तीत जास्त अभ्यासक्रमाचे ऑप्शन भरण्यात यावे.

2. ज्या उमेदवारांना प्रथम फेरीमध्ये शासकीय तंत्रकिनेतनामध्ये अलॉटमेंट झाले होते. त्यामुळे त्यांनी शासकीय तंत्रनिकेतनामधील प्रवेश फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केला आहे. परंतु, प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे (As per Revised Allotment) उमेदवारांनी भरण्यात आलेला ऑप्शन व गुणवत्तेनुसार विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये अलॉटमेंट झाले, अशा विद्यार्थ्यांनी विनाअनुदानित संस्थेत दि. 11.08.2017 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत रिपोर्टिंग करुन प्रवेश करणे व इच्छा असल्यास शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेत रिक्त होणाऱ्या अभ्यासक्रमाच्या चौथ्या फेरीमध्ये सहभाग घेऊन जास्तीत जास्त अभ्यासक्रमांचे ऑप्शन भरण्यात यावे.

3. ज्या उमेदवारांना प्रथम फेरीमध्ये विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये अलॉटमेंट झाले होते. त्यामुळे त्यांनी विनाअनुदानित तंत्रनिकेतनामधील प्रवेश फ्रिज (Freeze) करुन कन्फर्म केला आहे. परंतु, प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमुळे (As per Revised Allotment) उमेदवारांनी भरण्यात आलेला ऑप्शन व गुणवत्तेनुसार दुसऱ्या विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये अलॉटमेंट झाले, अशा विद्यार्थ्यांनी इच्छा असल्यास पहिल्या विनाअनुदानित संस्थेत जाऊन जर जागा रिक्त असतील आणि उमेदवारास ॲलॉट झालेले Seat Type उपलब्ध असेल व संस्थेने उमेदवारास त्या रिक्त जागेवर प्रवेश देण्याचे निश्चित केले तर अशा प्रकरणी प्रवेश देता येऊ शकेल.

अन्यथा प्रथम फेरीच्या सुधारित अलॉटमेंटमध्ये अलॉट झालेल्या विनाअनुदानित तंत्रनिकेतनात दि. 11.08.2017 पर्यंत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत प्रवेश घेण्यात यावा. तसेच इच्छा असल्यास शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेत रिक्त होणाऱ्या अभ्यासक्रमाच्या चौथ्या फेरीमध्ये सहभाग घेऊन जास्तीत जास्त अभ्यासक्रमाचे ऑप्शन भरण्यात यावे.

**अनुक्रमांक 2 व 3 बाबत** विनाअनुदानित तंत्रनिकेतनाने कार्यवाही करताना Admission Portal मधुन संस्थेच्या Login मधून मेसेज करुन मेसेज बॉक्सव्दारे संचालनालयास Admin यांना मेसेज करुन त्यांच्या संस्थेत उपस्थित झालेल्या उमेदवाराची Seat Type available असल्याचे व संस्था संबंधित उमेदवारास प्रवेश देण्यास तयार असल्याचा मेसेज पाठवल्यावर या उमेदवाराचा प्रवेश निश्चित करण्यासाठी मान्यता देण्याची कार्यवाही झाल्यानंतर असा प्रवेश Confirm करता येईल. अशा प्रकारचे केलेले प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत केलेले आहेत असे समजुन सदर विद्यार्थ्यांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे लाभ लागु राहतील. अशा प्रकारे थेट संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करण्यासाठी अंतिम संधी म्हणजे दि. 11.08.2017 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत असेल. विद्यार्थी व पालकांनी ही संधी कोणत्याही कारणास्तव गमावल्यास त्यांना पुनश्च: कोणत्याही सबबीखाली अशी संधी मिळणार नाही.

**(डॉ. सुभाष महाजन)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत:** मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर
**प्रतिलिपी:** 1. कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सदर सूचना विदयार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेचा अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.
2. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर तसेच यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
3. संबंधित प्राचार्य, सर्व पदविका अभियांत्रिकी संस्था